**विशेष दिवाणी दावा क्र. ८९/२०२०**
**सुशांत वि. निशांत वगैरे ७**

**<u>निशाणी ३४ खालील आदेश</u>**

१. वादीने प्रस्तुतचा अर्ज प्रतिवादींच्या नावे गाळपास गेलेल्या बिलाची रक्कम न्यायालयात जमा करणेकामी व एकुण बिल किती झाले याची कागदपत्रे सादर करण्यासाठी दिलेला आहे.

२. अर्जातील कथने थोडक्यात खालीलप्रमाणेः–

वादीने प्रस्तुतचा दावा वाटपासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केलेला आहे. दावा मिळकतीं पैकी काही मिळकतीत ऊसाचे पीक तोडणीस आलेले आहे. सध्या ऊस गळीताचे साखर कारखाने सुरु झालेले आहेत. प्रतिवादी क्र. १ ने दावा चालू असताना न्यायालयाचे परवानगी शिवाय दावा मिळकतीमधील गळीतास आलेला ऊस पांडुरंग सहकारी साखर कारखाना, श्रीपूर यास दिनांक २३.१०.२०२० पासून चालू केला आहे. तसेच, विठ्ठलराव शिंदे सहकारी साखर कारखाना पिंपळनेर, तालुका माढा यांना देखील दावा मिळकतीतील ऊस गळीतासाठी चालू केला आहे. प्रतिवादी क्र. १ व २ हे घाईगडबडीत दोन्ही कारखान्यास ऊस गळीतास घालीत आहेत व त्याची रक्कम कारखान्याकडुन उचलण्याच्या प्रयत्नात आहेत. त्यामुळे सदर ऊसाच्या तपशीलाचे कागदपत्र

मागविण्यासाठी व त्याचे ऊस बिलाची रक्कम न्यायालयात जमा करण्यासाठी प्रस्तुतचा अर्ज दाखल करणे भाग पडले.

३. प्रतिवादी क्र. १ व २ यांनी त्यांचे म्हणणे निशाणी ४२ कडे दाखल करुन, वादीचा अर्ज अमान्य केला. वादीने प्रस्तुतचा अर्ज केवळ प्रतिवादींचे नुकसान व्हावे या उद्देशाने दिलेला आहे. त्याचे पुष्ट्यर्थ त्याने पुरावा दिलेला नाही. वादीने स्वतःच्या नावे असलेल्या जमिनीची वस्तुस्थिती लपवून ठेवून चुकीचा अर्ज दाखल केलेला आहे.

४. प्रतिवादींचे पुढे असे कथन आहे की, दावा मिळकतीमध्ये लागवड केलेला ऊस हा त्यांनी केलेला आहे व त्याचा खर्च देखील त्यांनी केलेला आहे. सदर ऊसाबाबतचा तपशील आल्याखेरीज कारखान्या विरुद्ध कोणताही आदेश पारीत करणे योग्य होणार नाही. वादीचे नावे असलेल्या जमिनीमध्ये कोणत्याही स्वरुपाचे पीक नाही. ही परिस्थिती लपवून ठेवून केलेला अर्ज मंजूर करता येणार नाही. तसेच, साखर कारखान्याला पक्षकार केले नसल्यामुळे त्याचे विरुद्ध आदेश करता येणार नाही. वादी दाव्यामध्ये दरम्यानचे उत्पन्न मागू शकतात, परंतु ते त्यांनी मागितले नाही. तसेच, साखर कारखान्याचे बिलाबाबत दरम्यानच्या उत्पन्नाची मागणी करता येते. असे असताना देखील प्रस्तुतचा अर्ज दाखल केला आहे व तो नामंजूर करण्याची विनंती केली.

५. अर्ज वाचला, त्यावरील प्रतिवादींचे म्हणणे पाहिले, अभिलेख अवलोकीला. वादीचे विद्वान विधिज्ञ श्री. आर. एस. वाघमोडे व प्रतिवादींचे विद्वान विधिज्ञ श्री. एस. एस. निंबाळकर यांचा युक्तिवाद ऐकला. वादीने प्रस्तुतचा दावा प्रतिवादीं विरुध्द सरस निरस मानाने वाटपासाठी, स्वतंत्र कब्जासाठी व निरंतर ताकीदीसाठी दाखल केला आहे. प्रतिवादींनी हजर होवून, त्यांचे लेखी म्हणणे देवून, दावा मिळकती या त्यांच्या व वादीच्या वडीलार्जीत असल्याचे मान्य केले आहे. सबब, सदर मिळकतीतून गेलेल्या ऊसाच्या बिलाच्या रक्कमेमध्ये सकृतदर्शनी वादीस हिस्सा येतो. वादीस हिस्सा आहे अगर कसे, तसेच सदर मिळकतीमधील ऊस पीक हे प्रतिवादींनीच खर्च करुन केले त्यामुळे तेच सदरचे बिल मिळण्यास पात्र आहेत अथवा नाहीत, या बाबीं दाव्याचे अंतिम गुणदोषाच्यावेळी ठरणार आहे. अशा परिस्थितीत दावा मिळकतीतून निघालेल्या ऊस पीकाची कारखान्याकडुन मिळणारी रक्कम उभयपक्षकारांना दाव्याचा अंतिम निकाल होईपर्यंत अदा न करण्याबाबत संबंधित साखर कारखान्यास आदेशीत करणे योग्य होईल. सदर रक्कमेची प्रतिवादींना तातडीची गरज आहे असे काही पटलावर आलेले नाही. तसेच, रक्कम उभयपक्षकारांना न दिल्यास, त्यांची काही अपरिमीत हानी होईल असे देखील नाही. तसेच, अंतिम निकालाच्यावेळी जो पक्षकार त्याची शाबीती करेल, तो सदर रक्कम व्याजासह मिळण्यास पात्र होईल. अशा परिस्थितीत प्रतिवादींच्या नावे उपरोक्त नमूद साखर कारखान्याकडे गेलेल्या ऊस बिलाचा तपशील व त्याची रक्कम याबाबतचा

तपशील मागविणे गैर होणार नाही व सदर तपशील प्राप्त झाल्यानंतर त्याबाबत आदेश करणे उचीत होईल. सबब, प्रतिवादींच्या नावे सदर साखर कारखान्यांकडे सन २०२०–२०२१ या गाळप हंगामामध्ये जमा केलेल्या ऊस बिलाचा व त्यासंबंधीच्या रक्कमांबाबत संबंधित कारखान्यांकडुन माहिती मागवावी व सदर माहिती प्राप्त झाल्यावर सदर अर्ज पुन्हा आदेशासाठी ठेवण्यात यावा.

Ratnakar Sudhakar Kshirsagar
Digitally signed by Ratnakar Sudhakar Kshirsagar
Date: 2020.11.12 09:50:42 +0530

माळशिरस. (**र. सु. क्षीरसागर**)

दि. ११/११/२०२०. दिवाणी न्यायाधीश व. स्तर, माळशिरस.

**<u>C E R T I F I C A T E</u>**

I affirm that the contents of this PDF file Judgment is same word to word as per the original Judgment.

| | | | |
|---|---|---|---|
| (a) | Name of the Stenographer | : | **N. N. Konda, Grade-II** |
| (b) | Court | : | **Civil Court Senior Division, Malshiras.** |
| (c) | Judgment signed by P.O. on | : | **11.11.2020.** |
| (d) | Judgment uploaded on | : | **11.11.2020.** |